चेंबूर – तुर्भे शिक्षण संस्थेचे

# ना. ग. आचार्य व दा. कृ. मराठे
# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

चेंबूर , मुंबई – ४०००७१

( नॅक ‘अ’श्रेणी प्रमाणित )

*

विद्यापीठ अनुदान आयोग अनुदानित

आणि

मराठी विभाग आयोजित

o

राष्ट्रीय चर्चासत्र

# साहित्येतिहासाच्या बदलत्या संकल्पना

मंगळवार, दिनांक : ९ जानेवारी २०१८

## आचार्य –मराठे महाविद्यालयाविषयी

ना. ग. आचार्य व दा.कृ.मराठे महाविद्यालयाची स्थापना चेंबूर – तुर्भे शिक्षण संस्थेद्वारे १९७८ साली झाली. चेंबूर व आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन शिक्षणाची निकड ध्यानात घेऊन अवघ्या साडेतीनशे विद्यार्थ्यांसह सुरू झालेल्या या महाविद्यालयाची विद्यार्थीसंख्या आज साडेसात हजारांच्या घरात आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे व त्यांचे सर्वांगीण सबलीकरण करणे हा या संस्थेच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे.

महाविद्यालय मधल्या काळात अनेक अंगांनी विकसित झाले आहे. आज या महाविद्यालयात कला, विज्ञान व वाणिज्य शाखांसोबतच माहिती तंत्रज्ञान, संगणकविज्ञान, व्यवस्थापन या विषयांतील पदवी अभ्यासक्रम, वाणिज्य शाखेतील व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम आणि त्यासोबतच वाणिज्य व रसायनशास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम इत्यादी विभागही कार्यरत आहेत.

## चर्चासत्राचा हेतू

साहित्येतिहासाची सिद्धता हा साहित्याभ्यासाचा अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. पदवी व पदव्युत्तर पातळीवरील साहित्याच्या अभ्यासात साहित्येतिहासाच्या अभ्यासपत्रिकांचा समावेश असतोच, त्यासोबतच एकूण अभ्यासक्रमालाही ऐतिहासिकतेचे परिप्रेक्ष्य असते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पुढे आलेल्या अनेक सिद्धान्तव्यूहांनी आधुनिक प्रबोधनपरंपरेतून आकाराला आलेल्या अभिजात इतिहासकल्पना नाकारल्या. इतिहासलेखनाचे पद्धतिशास्त्र व इतिहासाची संकल्पना यांत अनेकविध बदल झाले. इतिहासाची रचितता व कथनात्मकता अधिक ठळकपणे विचारात घेणारी, त्याचे कल्पनाप्रणालीमय रूप उघड करणारी अनेक प्रारूपे पुढे आली. या पार्श्वभूमीवर इतिहासविषयक सैद्धान्तिक विचार व प्रत्यक्ष इतिहासलेखनाचा व्यवहार अमूलाग्रपणे बदलला. साहित्याचा इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेवरही त्याचा खोलवरचा परिणाम होणे साहजिकच होते. जगभर साहित्येतिहासाची नवी प्रारूपे कशी सिद्ध करता येतील, साहित्यसमीक्षा व साहित्यसिद्धान्त दोहोंतील मर्मदृष्टींचा वापर करीत अधिक अर्थपूर्ण अशा साहित्येतिहासाची निर्मिती कशी करता येईल याचे अनेक पर्याय पुढे आले. साहित्येतिहासलेखन हा एक सांस्कृतिक-सामाजिक हस्तक्षेपाची क्षमता असणारा व्यवहार आहे. आकादमिक वर्तुळापलीकडे त्याची अर्थपूर्णता विविध पातळ्यांवरील राजकीयतेतून, सत्तांच्या बलाबलातून व्यक्त होते. सामाजिक-सांस्कृतिक ओळखींचे निर्धारण करण्यात साहित्येतिहासाचा मोठा वाटा असतो.

साहित्येतिहासमीमांसेच्या सद्यस्थितीची सांगोपांग चर्चा करणे व साहित्येतिहासविषयक व पर्यायाने इतिहासविषयक नव्या-जुन्या प्रारूपांच्या सामर्थ्यमर्यादांची चर्चा करणे. तसेच, मराठीतील शतकभराहून दीर्घ परंपरा लाभलेल्या साहित्येतिहासलेखनाच्या व्यवहाराचे चिकित्सक मूल्यमापन करणे हा या चर्चासत्राचा प्रमुख हेतू आहे.

## कार्यक्रम पत्रिका

| | | |
|---|---|---|
| नोंदणी व अल्पोपाहार | स. ९.०० ते ९.३० | |
| उद्घाटनपर सत्र | स. ९.३० ते ११.३० | |
| **प्रास्ताविक** | : | **प्राचार्या डॉ. विद्यागौरी लेले** |
| **उद्घाटनपर भाषण** | : | **डॉ. नागनाथ कोत्तापल्ले** |
| **बीजभाषण** | : | **इतिहास आणि साहित्येतिहास**<br>**डॉ. राजा दीक्षित** |
| सत्र पहिले | स. ११. ३० ते दु. १.३० | |
| **अध्यक्ष** | : | **डॉ. हरिश्चंद्र थोरात** |
| **निमंत्रित अभ्यासकांचे निबंध** | : | **१. साहित्येतिहासाची संस्कृतिलक्ष्यी संकल्पना**<br>**प्रा. चिन्मय धारूरकर (केरळ)**<br>**२. साहित्यप्रकार आणि साहित्येतिहास**<br>**प्रा. शैलेश औटी (वसई)** |
| भोजनावकाश | दु. १.३० ते २.१५ | |
| सत्र दुसरे | दु. २.१५ ते ४.०० | |
| **अध्यक्ष** | : | **डॉ. वसंत पाटणकर** |
| **निमंत्रित अभ्यासकांचे निबंध** | : | **१. साहित्येतिहास आणि साहित्यसमीक्षा**<br>**डॉ. कैलास जोशी (वाडा)**<br>**२. मराठी साहित्येतिहासाचे स्वरूप**<br>**श्री. सुशान्त देवळेकर (मुंबई)** |
| सत्र तिसरे | दु. ४.०० ते ५.३० | |
| **अध्यक्ष** | : | **डॉ. अनिल सकपाळ (मुंबई)** |
| **निबंध-सहभागाचे आवाहन** | : | **स्वीकृत निबंधांचे वाचन** |

विषयसूत्रे – **साहित्येतिहासाचे अध्यापन**<br>
**साहित्येतिहास आणि रूपबंध**<br>
**समाज आणि साहित्येतिहास**<br>
**साहित्येतिहासाची मराठी परंपरा**<br>
**मराठी कथा / कादंबरी / नाटक / कविता इ. साहित्यप्रकारांचे इतिहास**

| | | |
|---|---|---|
| समारोप सत्र | सायं. ५.३० ते ६.०० | |
| **चर्चासत्रातील उपलब्धींचे सारसंकलन व निरीक्षणे** | : | **डॉ. रेखा इनामदार साने (पुणे)** |
| आभार | | |

## निबंध-सहभागाचे आवाहन

या चर्चासत्राच्या विषयसूत्राशी संबंधित खालील उपविषयांवर निबंध पाठविण्याचे आवाहन आम्ही करीत आहोत.

- **साहित्येतिहासाचे अध्यापन**
- **साहित्येतिहास आणि रूपबंध**
- **समाज आणि साहित्येतिहास**
- **साहित्येतिहासाची मराठी परंपरा**
- **मराठी कथा / कादंबरी / नाटक / कविता इ. साहित्यप्रकारांचे इतिहास**

आपले निबंध **३१ डिसेंबर, २०१७** पर्यंत amsemarathi18 @ gmail.com या इ-टपाल पत्त्यावर पाठवावेत.

निबंधासाठी शब्दमर्यादा १५०० ते २००० शब्द अशी ठरविली आहे.

सोबत चर्चासत्राचे नोंदणीशुल्कही चेक /डी.डी. स्वरूपात पाठवावे किंवा एनइएफटी/आरटीजीएस द्वारे कॉर्पोरेशन बँक, चेंबूर शाखा, खाते क्र. 520101198298389, IFSC Code: CORP0000282 या खात्यात जमा करावे.

हे निबंध यू.जी.सी. मान्यताप्राप्त अंकात छापले जातील.

चर्चासत्राचे नोंदणीशुल्क - आवाहनावरून निबंधसहभाग - ₹ १०००,
चर्चासत्रात सहभाग - ₹ ५००, विद्यार्थी - ₹ २००

संपर्क – प्रा. ज्योती रोटे - ९६१९४८५६११, प्रा. मृदुला वाघमारे - ८१६९१९२१५३,
प्रा. अश्विनी रानडे – ९८३३२८४८५३, प्रा. रवींद्र चव्हाण - ९८३३६५३५५६

# सर्वांचे हार्दिक स्वागत

आपले,

**विश्वस्त, चेंबूर-तुर्भे शिक्षण संस्था**

। ॲड. श्री. लीलाधर डाके (अध्यक्ष) ।
। श्री. रमेश म्हापणकर (प्रधान सचिव) । श्री. सुबोध आचार्य (सहसचिव) ।
। श्री. एम. एन. राममूर्ती (खजिनदार) ।

**चर्चासत्र सल्लागार समिती**

। डॉ. विद्यागौरी लेले (प्राचार्य) ।
। डॉ. बी. एन. गायकवाड (उपप्राचार्य) । प्रा. लियाकत अली (उपप्राचार्य)।
। प्रा. अमिता लाल (उपप्राचार्य) । श्रीमती सुप्रिया मंत्री (प्रबंधक)।

**चर्चासत्र कार्यकारी समिती**

। प्रा. ज्योती रोटे (चर्चासत्र समन्वयक) ।
। प्रा.माणिक टेंबे । प्रा. अश्विनी रानडे । प्रा. रमा साखळकर ।
। डॉ. सुधाकर मोरे । डॉ. सायरा मुल्ला । प्रा. रवींद्र चव्हाण । प्रा. माधुरी सिंग । प्रा. प्रसन्ना राजन ।
। प्रा. मृदुला वाघमारे । प्रा. तेजल आवारे । प्रा. रामदास गिळंदे। प्रा. आर्या आपटे ।
। प्रा. मार्गश्री भट । प्रा. किरण मरियप्पगोळ ।
। श्रीम. आशा मांजर्डेकर ।

पुस्त-प्रेष

चेंबूर – तुर्भे शिक्षण संस्थेचे

# ना. ग. आचार्य व दा. कृ. मराठे
# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

चेंबूर , मुंबई – ४०००७१

( नॅक 'अ' श्रेणी प्रमाणित )

प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

## निमंत्रण

विद्यापीठ अनुदान आयोग अनुदानित राष्ट्रीय चर्चासत्र

# साहित्येतिहासाच्या बदलत्या संकल्पना

मंगळवार, दिनांक : ९ जानेवारी, २०१८